# वसई-विरार शहर महानगरपालिका

## क्रीडा विभाग

दि.३०/०७/२०२४

**"जाहीर आवाहन"**

प्रतिवर्षीप्रमाणे सामाजिक व धार्मिक उत्सव "गोपाळकाला" (दहीहंडी) मंगळवार, दि.२७ ऑगस्ट, २०२४ रोजी सर्व ठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे. गोविंदा पथक ह्या उत्सवात मोठ्या उत्साहाने भाग घेतात. दहीहंडी उत्सवात भाग घेणारे गोविंदा पथक आपले ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न प्रत्येक प्रसंगी किंवा उत्सवाच्या वेळी करीत असतात. उत्सवामधील जोखीम व धोका विचारात घेऊन गोविंदा पथकात भाग घेणाऱ्या गोविंदा (खेळाडू) यांना विम्याचे संरक्षण देणेसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने गोपाळकाला अपघात विमा योजनेस मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत दहीहंडी पथकातील सर्व गोविंदांचा मोफत अपघात विमा काढण्यात येणार आहे. गोविंदा अपघात विमा योजनेचा फॉर्म महानगरपालिकेच्या vvcmc.in या वेबसाईट वर उपलब्ध असून विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिका, नवीन प्रशासकीय इमारत, क्रीडा विभाग, चौथा मजला, यशवंत नगर रोड, विरार (पश्चिम) येथे भेट द्यावी. विमा योजनेचा लाभ घेणेसाठी अंतिम तारीख शुक्रवार दि.१६ ऑगस्ट, २०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

तरी महानगरपालिका हद्दीतील सर्व गोविंदा पथकांनी महानगरपालिकेशी संपर्क साधून पथकात समाविष्ट गोपाळांचा विमा काढून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

**क्रीडा विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**